## जोडपत्र "अ" (२)

# महाराष्ट्र शासनाचा माहिती मिळविण्याचा अधिकार २००५

## माहिती मिळविण्याकरिता अर्ज

प्रति,
मा. जनमाहीती अधिकारी सो.,
~~मिरारोड पोलीस स्टेशन.~~
नगरसचिव विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका
सचिव विभाग
स.प./न.प./ज.प./का.प./मा.अ.
आवक क्र ..०६... दि: ०७/५/२०२४

(मुद्रांक: 10 रु. / Rs.10 COURT FEE भारत INDIA दस रुपये TEN RUPEES)

१) अपिलकाराचे पुर्ण नांव : सजी आय.पी.,

२) अपिलकाराचा पुर्ण पत्ता : पत्ता : शॉप नं. ८, हैप्पी होम अपार्टमेंट, शांती पार्क, मिरारोड पूर्व, ता. जि. ठाणे. मो. नं. ९८२०२२६७११

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील : **प्रभाग क्र. १९ चे नगर सेवक श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा यांचे नगरसेवक पद रद्द करण्यासाठी दिलेल्या तक्रार अर्जावर करण्यात आलेल्या कारवाईची सर्व माहीती.**

(एक) माहिती विषय : **वरील प्रमाणे**

(दोन) माहितीशी संबधित कालावधी : **सन २०१७ ते आजपर्यंत**

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :
१) त्या कार्याकाळात असलेल्या आयुक्तांचे नांव व त्यांनी केलेल्या कारवाईची सर्व माहीती.
२) नगरसचिवा मार्फत किती वेळा आयुक्तांकडे कारवाई साठी सादर केल्याची सर्व माहीती.
३) कारवाई न केल्यास त्या संबंधित सर्व माहीती.
४) सुनावणी संबंधित सर्व माहीती.
५) तक्रारीवर केलेल्या अंतीम कारवाईची सर्व माहीती.

(चार) **माहिती टपालाद्वारे किंवा व्यतीशः आवश्यक आहे किंवा नाही कसे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरीक्त शुल्कामध्ये सामाविष्ट केला जाईल.** : व्यक्तिश :

४) अर्जदार दारिद्रय रेषेखालील आहे किंवा नाही : **नाही**

५) **ज्यासाठी महिती आवश्यक आहे ते प्रयोजन** : न्यायालयीन कामाकरीता

ठिकाण : मिरा रोड
दिनांक :

सही

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
सचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./०८/2024-25

दिनांक :- ०४/०६/2024

**प्रति,**

**श्री. सजी.आय.पी.**
**शॉप क्र. 08, हॅप्पी होम अपार्टमेंट क्र. 01,**
**शांती पार्क, मिरारोड (पूर्व)**

**विषय :-** **<u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.</u>**
**प्रभाग क्र. 19 चे नगरसेवक श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा यांचे नगरसेवक पद रद्द करण्यासाठी दिलेल्या तक्रार अर्जावर करण्यात आलेल्या कारवाईची सर्व माहिती.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 7/05/2024 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण प्रभाग क्र. 19 चे नगरसेवक श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा यांचे नगरसेवक पद रद्द करण्यासाठी दिलेल्या तक्रार अर्जावर करण्यात आलेल्या कारवाईची माहितीची मागणी केलेली आहे.

मुद्दा क्र. 1 - आयुक्तांची नावे - डॉ. नरेश गिते, 2. श्री. बी.जी. पवार, 3. श्री. बालाजी खतगांवकर 4. श्री. चंद्रकांत कृ. डांगे 5. डॉ. विजय राठोड, 6. श्री. दिलीप ढोले, 7. श्री. संजय काटकर.

मुद्दा क्र. 1 अंशत: व 2 ते 5 - माहिती अधिकार नियमांतर्गत कारवाई केली अथवा नाही असे विचारणे अपेक्षित नाही. तथापी, सदर नस्तीचे तपासणी केली असता सदर प्रकरणी मा. आयुक्त यांचेकडे वेळोवेळी सुनावणी घेण्यांत आलेल्या असल्याचे दिसून येत असुन, सदर सुनावणीचे इतिवृत्तांताच्या साक्षांकित प्रती आपणांस उपलब्ध करुन देत आहोत.

यासाठी लागणारे शुल्क प्रति पान रुपये 2/- याप्रमाणे एकूण 3 पानांकरिता रुपये 6/- (अक्षरी रुपये सहा मात्र) महानगरपालिका फंडात भरणा करुन पावतीची छायांकित प्रत जमा करुन माहिती घेण्यात यावी.

**(जयेश पाटील)**
**सहा. जनमाहिती अधिकारी**
**नगरसचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
सचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./०८ /2024-25

दिनांक :-११ /०६/2024

प्रति,
श्री. सजी.आय.पी.
शॉप क्र. 08, हॅप्पी होम अपार्टमेंट क्र. 01,
शांती पार्क, मिरारोड (पूर्व)

विषय :- <u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.</u>
प्रभाग क्र. 19 चे नगरसेवक श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा यांचे नगरसेवक पद रद्द करण्यासाठी दिलेल्या तक्रार अर्जावर करण्यात आलेल्या कारवाईची सर्व माहिती.

संदर्भ :- आपणांकडील दि. 7/05/2024 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण प्रभाग क्र. 19 चे नगरसेवक श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा यांचे नगरसेवक पद रद्द करण्यासाठी दिलेल्या तक्रार अर्जावर करण्यात आलेल्या कारवाईची माहितीची मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने आपणांस सुनावणीचे इतिवृत्तांताच्या साक्षांकित प्रती आपणांस या पत्रासोबत जोडून देत आहोत. (एकूण पाने 3)

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

(जयेश पाटील)
सहा. जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

११/०६/२०२४